लोकमत पु. पान क्र. 1

# मीरा-भाईंदरला भाजपची उमेदवारी नरेंद्र मेहतांना

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघाचा महायुती आणि नंतर भाजपमध्ये जागा वाटप, उमेदवारी-वरून चाललेला अटीतटीचा तिढा अखेर उमेदवारी अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवशी सुटला आहे. भाजपकडून मंगळवारी सकाळी प्रसिद्ध केलेल्या यादीत माजी आ. नरेंद्र मेहता यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. त्यामुळे मेहता समर्थकांनी जल्लोष केला आहे.

मीरा-भाईंदरच्या माजी महापौर राहिलेल्या गीता जैन यांनी २०१९ मध्ये तत्कालीन भाजपचे उमेदवार आ. मेहतांचा पराभव केला होता. त्यावेळीही जैन यांनी भाजपकडून उमेदवारी मागितली होती, परंतु मेहता हे भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि मंत्री रवींद्र चव्हाण यांच्या मर्जीतले मानले जात असल्याने त्यांना उमेदवारी मिळाली होती.

आमदार झाल्यावर जैन या भाजपसोबत गेल्या. मात्र सरकार बदलल्याने शिवसेनेला पाठिंबा दिला. ठाकरे सरकार पडणार असताना जैन यांना परत भाजपने जवळ केले होते.



## मतदारसंघ भाजपकडे

**१** भाजप नेत्यांच्या सूचनेनुसार त्या एकनाथ शिंदे यांच्या गोटात सहभागी होत गुवाहाटीला गेल्या. शिंदे-फडणवीस या दोघांनी जैन यांना उमेदवारी देण्याचे आश्वस्त केले होते. दुसरीकडे शिंदेसेनेने मीरा-भाईंदरवर दावा केला होता.

**२** **मीरा-भाईंदर मतदारसंघ भाजपच्या वाट्याला शेवटच्या क्षणी गेला. तशीच भाजपची उमेदवारीही शेवटच्या क्षणी २९ ऑक्टोबर रोजी नरेंद्र मेहता यांना दिली गेली. यावरून या मतदारसंघात महायुतीत रस्सीखेच होती, तेवढीच भाजपमध्ये उमेदवारी मिळवण्यावरून होती, असे स्पष्ट होते.**

**३** मेहता यांनी विविध प्रकारे शक्तिप्रदर्शन चालवले होते. तर स्वतःसह पत्नीचाही अर्ज भाजप व अपक्ष म्हणून दाखल केला होता.

# रात्री ७ ते १० वाजेपर्यंतच दिवाळीत फटाके फोडा

## वसई-विरार पालिकेचे जनतेला आवाहन

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मुंबई उच्च न्यायालयाने जनहित याचिकेन्वये एमएमआर क्षेत्रातील हवेची गुणवत्ता खालावल्याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. हवेची गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपाययोजना आणि जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. दरम्यान, सर्व नागरिकांनी दीपावली कालावधीमध्ये रात्री ७ ते १० वाजेपर्यंतच फटाके फोडावेत, तसेच सर्वांनी पर्यावरणपूरक प्रदूषणमुक्त व कचरामुक्त दिवाळी साजरी करण्याबाबत वसई-विरार महापालिकेने आवाहन केले आहे.

वातावरणीय बदलाच्या अनेक कारणांपैकी हवेचे प्रदूषण हे महत्त्वाचे कारण आहे. विविध सण, उत्सवप्रसंगी आपण वाजवत असलेल्या फटाक्यांमध्ये कार्बन डायऑक्साइड व सल्फरचे प्रमाण अधिक असते.



## विषारी वायूचे उत्सर्जन

**१** जे विषारी वायूचे उत्सर्जन करतात, या उत्सर्जनामुळे पृथ्वीवरील तापमानात वाढ होत असून, हे वायू, वनस्पती, पक्षी, प्राणी, तसेच सर्व मानवी प्रजातीस हानी पोहोचवतात. हवेचे प्रदूषण थांबवण्याची क्रिया आपण स्वतःपासून सुरू करू शकतो.

**२** महाराष्ट्र शासनाने माझी वसुंधरा अभियानांतर्गत फटाकेमुक्त, कचरामुक्त, प्रदूषणमुक्त व पर्यावरणपूरक ग्रीन फेस्टिवल, सण-उत्सव साजरे करण्याचा प्रयत्न करण्याबाबत सूचित केले आहे.

# बोईसरमधून राजेश पाटील



**बोईसर :** बोईसर विधानसभा मतदारसंघामध्ये बहुजन विकास आघाडीच्या वतीने विद्यमान आमदार राजेश पाटील यांनाच पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. राजेश पाटील यांनी मंगळवारी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. या ठिकाणी उद्धवसेनेचे डॉ. विश्वास वळवी, शिंदेसेनेचे विलास तरे यांच्याशी त्यांची लढत होणार आहे.

# दोन ट्रकचा भीषण अपघात

**पारोळ :** मुंबई-अहमदाबाद महामार्गावर भारोळ येथे दोन ट्रकचा समोरासमोर भीषण अपघात झाला. या अपघातात दोन्ही वाहनांचे चालक गंभीर जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी पहाटे घडला. महामार्गावर भारोळ येथे मुंबईकडे जाणाऱ्या वाहिनीवर समोरासमोर दोन वाहने आल्याने हा अपघात घडला. अपघातात दोन्ही वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे. या अपघातामुळे महामार्गावर मोठ्या प्रमाणात कोंडीसुद्धा झाली होती. गुजरातकडे जाणाऱ्या वाहिनीच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू असल्यामुळे वाहतूककोंडी होती. त्यामुळे विरुद्ध दिशेने जात असताना हा अपघात घडला.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पू. पान क्र. 1

# कार्यकर्त्यांनो, प्रचार करताना काळजी घ्या!

## नियमभंग केल्यास होणार कारवाई

लोकमत न्यूज नेटवर्क

**पारोळ :** निवडणूक काळात कार्यकर्ते अधिक उत्साही असतात. मात्र, अत्युत्साहात नियम मोडला गेल्यास त्यावर निवडणूक यंत्रणेची नजर राहणार आहे. यामुळे कार्यकर्त्यांनीही प्रचार करताना काळजी घेणे गरजेचे आहे.

अनेकदा मतदारसंघ मोठा असल्यामुळे बहुसंख्य उमेदवार कार्यकर्त्यांच्या माध्यमातून मतदारांपर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करत असतात. मात्र, उमेदवाराचा प्रचार करताना कार्यकर्त्यांनाही आचारसंहितेचे पालन करावे लागणार आहे. त्यांच्यावरही काही नियम, निर्बंध घातले आहेत. आदर्श आचारसंहितेचे पालन होण्यासाठी जिल्हा निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी संपूर्ण यंत्रणेला निर्देश दिले आहेत. त्यासाठी आढावासुद्धा घेतला जाणार आहे.

प्रचार वाहनांसाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक आहे. अर्ज, वाहनाचे आरसी बुक सादर करणे, वाहनाचा विमा, कर भरणा पावती, पीयूसी, फिटनेस प्रमाणपत्र, प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचे नाहरकत प्रमाणपत्र सादर करावे लागेल. वाहनाचा चारही बाजूंचा फोटो तसेच संबंधित वाहनासाठी पोलिसांचा नाहरकत दाखला आवश्यक आहे.

निवडणुकीदरम्यान प्रचार करताना नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. त्यात प्रचार वाहन, ध्वनिक्षेपक, झेंडे, बॅनर अशा सर्वच घटकांसाठी त्या त्या विभागांची परवानगी घ्यावी लागणार आहे. आचारसंहितेचे सर्वांना काटेकोर पालन करावे लागणार आहे.



### ध्वनिक्षेपकास मनाई

पोलिस अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ध्वनिक्षेपक वापरता येणार नाही. सकाळी सहा वाजण्यापूर्वी आणि रात्री १० वाजल्यानंतर ध्वनिक्षेपक वापरावर बंदी आहे. ध्वनिक्षेपकासह फिरणाऱ्या वाहनास प्रतिबंध करण्यात आला आहे. फिरणाऱ्या वाहनांनी एका ठिकाणी थांबूनच प्रचार करावा. ध्वनिक्षेपकाचा वापर, विशिष्ट ध्वनिक्षेपकाच्या परवानगीची माहिती कळविणे बंधनकारक आहे.



### झेंडे, भित्तिपत्रके लावण्यास निर्बंध

खासगी जागेत झेंडे, भित्तिपत्रके लावण्यासाठी मालकाच्या परवानगीची आवश्यकता असते. झेंड्याच्या काठ्या उभारणे, कापडी बॅनर, घोषणा लिहिण्यासाठी संबंधित यंत्रणेची परवानगी आवश्यक. इमारतीचे आवार, भिंती यावर पत्रक, जाहिराती लावण्यासाठी जागा मालकाची परवानगी आवश्यक आहे.

# खंडेलवाल यांची बंडखोरी



**मीरा रोड :** मीरा-भाईंदरमधून भाजपने माजी आ. नरेंद्र मेहता यांना पुन्हा एकदा उमेदवारी दिल्यामुळे भाजपच्या एका गटात नाराजी पसरली असून, भाजपचे माजी सभापती सुरेश खंडेलवाल यांनी मंगळवारी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला. भाजपने मेहतांना उमेदवारी दिल्यावर त्यांच्या समर्थकांनी जल्लोष केला असला तरी आ. गीता जैन यांच्यासह भाजपचे विधानसभा निवडणूक निर्णयप्रमुख ॲड. रवी व्यास आदींसाठी हा धक्का मानला जात आहे. त्यातूनच भाजपमध्ये नाराजी आणि बंडखोरी होत आहे. भाईंदर पश्चिम भागातील भाजपचे माजी नगरसेवक व माजी सभापती सुरेश खंडेलवाल यांनी मंगळवारी अपक्ष म्हणून उमेदवारी अर्ज भरला.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकमत पु पान क्र.1

# पालघरमध्ये रंगणार दुरंगी-तिरंगी लढती

## प्रमुख पक्षांच्या उमेदवारांनी भरले अर्ज : वसईत काँग्रेस अन् भाजपचे शक्तिप्रदर्शन

विधानसभा २०२४ लोकमत सुपर Vote

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईसह जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांच्या उमेदवारांनी अखेरच्या दिवशी अर्ज दाखल केल्यानंतर जिल्ह्यात दुरंगी आणि तिरंगी लढतींचे चित्र स्पष्ट झाले आहे.

वसई मतदारसंघात मंगळवारी महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील यांनी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दुपारी साडेबारा वाजता भरला. त्यांच्या मागोमाग महायुतीच्या वतीने भाजपच्या उमेदवार ॲड. स्नेहा दुबे-पंडित यांनीही शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. दुपारी अडीचच्या सुमारास शिवसेनेचे ज्येष्ठ नेते विनायक निकम यांनी वसई विधानसभा मतदारसंघातून आपला अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला.

विजय पाटील यांच्यासोबत त्यांचे पुतणे सुशांत पाटील, जनार्दन पाटील ऊर्फ जन्या मामा यांनीही उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. काँग्रेसचे ओनिल आल्मेडा, आम आदमी पार्टीचे जॉन परेरा, लिनस डिकुन्हा, सेबेस्टीन घोन्सालवीस यावेळी हजर होते. नरवीर चिमाजीअप्पा मैदान येथून वाजत-गाजत ही मिरवणूक काढण्यात आली.



वसई विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे विजय पाटील यांनी उमेदवारी अर्ज सादर केला.



वसई विधानसभा मतदारसंघात भाजपच्या स्नेहा दुबे-पंडित यांनी उमेदवारी अर्ज सादर केला.

### वसईत तिरंगी लढत

- वसई विधानसभेमधील निवडणूक बविआ विरुद्ध महाविकास आघाडी अशी रंगणार असल्याचे भाकीत काही दिवसांपूर्वीच व्यक्त केले जात होते.
- प्रत्यक्षात नेहमीप्रमाणे अनपेक्षितपणे ही निवडणूक बहुरंगी होण्याची शक्यता आहे. याच प्रकारे लढत होणार असल्यास त्यातून मोठ्या प्रमाणात मत विभाजन होणार आहे.
- वसई मतदारसंघातून ठाकूर विरुद्ध पाटील अशा थेट लढतीची शक्यता व्यक्त केली जात होती; परंतु महायुतीच्या उमेदवार स्नेहा दुबे यांच्यामुळे ही लढत तिरंगी झाली आहे.

### 'वेळ पडली तर लढून हरू; निवडणूक लढणारच'

१ वसई विधानसभा मतदारसंघामध्ये शिवसेनेचा दबदबा राहिलेला आहे. पक्षश्रेष्ठींच्या चुकीच्या धोरणामुळे अनेकदा येथील स्थानिक राजकीय गणिते निवडणूक काळात बदललेली आहेत.

२ शिवसेना फुटीनंतर जागा वाटपामध्ये शिवसेनेने वसई आणि नालासोपारा या दोन्ही मतदारसंघांमध्ये आपला उमेदवार न दिल्याने उद्धवसेनेमध्ये कमालीची नाराजी आहे.

३ पक्षाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे उद्धवसेनेतील कट्टर शिवसैनिक महाविकास आघाडीमधून फारकत घेऊन अपक्ष उमेदवारांच्या पाठीशी उभे राहिले आहेत.

४ यामुळे महाविकास आघाडीचे उमेदवार विजय पाटील यांच्यासोबत उद्धवसेनेचे प्रमुख पदाधिकारी अनुपस्थित असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. वेळ पडली तर लढून हरू; परंतु निवडणूक लढणारच, असा निश्चय उद्धवसेनेतील शिवसैनिकांनी केलेला आहे. ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. यानंतर लढतीचे खरे चित्र स्पष्ट होणार आहे.


### 'प्रहार'च्या धनंजय गावडेंचेही शक्तिप्रदर्शन



**नालासोपारा :** नालासोपारा विधानसभा मतदारसंघात स्वराज अभियानचे अध्यक्ष धनंजय गावडे यांनी अखेरीस मंगळवारी प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज भरला. उमेदवारी अर्ज भरताना त्यांच्यासोबत प्रहार जनशक्तीचे जिल्हाध्यक्ष हितेश जाधव, अरविंद राय, दुष्यंत पाटील, आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुशील द्विवेदी आणि स्वराज अभियानचे कार्याध्यक्ष प्रिंस सिंह आणि पदाधिकारी प्रवीण गायकवाड, शशी करपे, योगेश वैद्य आदी मान्यवर आणि हजारो कार्यकर्ते उपस्थित होते.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

लोकसत्ता पू. पान क्र. 1



# गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्याने अपघात

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई, विरार शहरातील रस्त्यांवरील अपघात रोखण्यासाठी तयार करण्यात आलेले गतीरोधक (स्पीडब्रेकर) वाहनचालकांसाठी जीवघेणे ठरू लागले आहेत. या गतिरोधकांवर पांढरे पट्टे नसल्याने दुचाकीस्वारांचे त्यावरून घसरून अपघात होऊ लागले आहेत.

शहरात रस्त्यांचे काँक्रीटीकरण करण्याबरोबर नवीन रस्ते तयार केले जात आहेत. या रस्त्यांवरून वाहनचालक वेगाने वाहने चालवत असल्याने अपघातग्रस्त होतात. यासाठी रस्त्यांवर दुभाजक आणि गतिरोधक तयार केले जातात. हे गतिरोधक दुरून वाहनचालकांना दिसावे यासाठी त्यावर पांढरे पट्टे मारणे अपेक्षित असते. परंतु अनेक दुभाजकांवर पांढरे पट्टे नाहीत. त्यामुळे अपघात होत आहेत.

अशा गतिरोधकांवर पालिकेने पांढरे पट्टे मारावे आणि संभाव्य अपघात टाळावे, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते शंकर बने यांनी केली आहे. दरम्यान पांढरे पट्टे मारण्याच्या सूचना ठेकेदाराला देण्यात आल्या आहेत. यापूर्वी जे गतिरोधक आहेत त्यांच्यावर पांढरे पट्टे आहेत, असे पालिकेच्या बांधकाम विभागाने सांगितले.

# ४० लाखांचा मुद्देमाल नागरिकांना परत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** नालासोपारा पोलिसांनी ६ वेगवेगळ्या गुन्ह्याचा छडा लावून जप्त करण्यात आलेला सुमारे ४० लाख रुपयांचा मुद्देमाल नागरिकांना परत केला आहे.

नालासोपारा पोलीस ठाण्यात दाखल चोरी, घरफोडी, फसवणूक आदी गुन्हे दाखल आहेत. त्यातील सहा गुन्ह्यांची पोलिसांनी कौशल्यपूर्ण उकल केली आहे. त्यात श्रीप्रस्था येथील जिमखाना वाईन शॉपमधील चोरी, आगाशी येथील मनोज कामत यांच्या घरातील २५ लाखांची चोरी आदींचा समावेश आहे. सोन्याचांदीचे दागिने, मोबाइल, दुचाकी, रोख रक्कम आदी सुमारे ४० लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी हस्तगत केला आहे. न्यायालयीन प्रक्रिया पार पाडल्यानंतर तो पोलीस ठाण्यात आयोजित एका कार्यक्रमात नागरिकांना परत करण्यात आला आहे. नालासोपारा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सदाशिव निकम, पोलीस निरीक्षक राजकुमार कोथमिरे, गुन्हे शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजेंद्र चंदनकर, पोलीस उपनिरीक्षक योगेश मोरे आदींच्या पथकाने कारवाई करून हा मुद्देमाल परत केला आहे.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 1

# निवडणूक निरीक्षक, खर्च निरीक्षकांचा दौरा

## मीरा–भाईंदर विधानसभा मतदारसंघात घेतला आढावा



**मीरा रोड :** आगामी महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मंगळवारी निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम व निवडणूक खर्च निरीक्षक सुरेंद्र पाल सिंग यांनी ठाणे जिल्ह्यातील १४५ मीरा-भाईंदर विधानसभा मतदारसंघास प्रत्यक्ष भेट दिली. निवडणूक कामकाजाचा आढावा घेतला. तसेच निवडणुकीत उमेदवारांकडून होणाऱ्या खर्चावर दक्षता आयोगाने लक्ष द्यावे, असे निर्देशही त्यांनी यावेळी दिले आहेत.

या भेटीत निवडणूक निरीक्षक कुमार पुरुषोत्तम व निवडणूक खर्च निरीक्षक सुरेंद्र पाल सिंग यांनी मतदारसंघातील निवडणूक कामकाजास्तव कार्यरत स्ट्राँग रूम, कंट्रोल रूमची पाहणी केली. एक खिडकी योजना पथक, खर्च निरीक्षक पथक, मनुष्यबळ पथक, नाके तपासणी पथक, खर्च निरीक्षक पथक, मनुष्यबळ पथक, स्टॅटिक सर्व्हिलन्स टीम (एसएसटी), तपासणी नाके टीम, चित्रीकरण दक्षता टीम, भरारी पथकसह कायदा व सुव्यवस्था पथक, ८५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग पथक, स्वीप पथक, प्रसारमाध्यम पथक, बॅलेट पेपर व मोर्क कॉपी पथक यांची सविस्तर माहिती घेतली. निवडणूक खर्च निरीक्षकांनी खर्च निरीक्षक पथक व प्रसारमाध्यम पथकास महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्याचबरोबर स्वीप पथकास लोकसभेपेक्षा जास्त मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी विविध माध्यमातून जास्तीत जास्त मतदानाविषयी जनजागृती करण्याच्या सूचना दिल्या.

यावेळी मीरा भाईंदर वसई विरार पोलीस उपआयुक्त प्रकाश गायकवाड, १४५ मीरा भाईंदर मतदारसंघाचे सहा. निवडणूक निर्णय अधिकारी निलेश गौंड, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी कल्पिता पिंपळे, सहा. निवडणूक निर्णय अधिकारी राजकुमार घरत, निवडणूक नायब तहसीलदार प्रदीप मुकणे, सर्व नोडल अधिकारी उपस्थित होते.

पुण्यनगरी पु. पान क्र. 7

## भाईंदरमध्ये वीज चोरीप्रकरणी गुन्हा



**मीरा रोड :** भाईंदर पूर्वेच्या नवघर पोलीस ठाणे हद्दीत अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीची सुमारे ११ लाखांची वीजचोरी केल्याप्रकरणी नवघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. भाईंदर पूर्वेच्या रूम नंबर १०२, संतोषी छाया बिल्डिंग, संदीप पार्क, खारीगाव येथे राहणारे नरेंद्र पाटील यांनी अदानी इलेक्ट्रिसिटी कंपनीची एकूण ४०९५० विद्युत युनिट मीटरमधून चोरी करून वापरत असल्याचे आढळले. त्याची अंदाजे रक्कम १० लाख ९२ हजार ६६२ रुपये आहे. नरेंद्र पाटील यांच्यावर वीज चोरी प्रकरणी अदानी इलेक्ट्रिसिटीचे तन्मय पाटील यांच्या तक्रारीवरून नवघर पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अमली पदार्थ विक्री करणाऱ्यास अटक

**मीरा रोड :** काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत अमली पदार्थाची विक्री करण्यासाठी आलेल्या आरोपीला काशिमीरा पोलिसांनी अटक केली आहे. काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीत विकास अच्छेलाल चौहान (२०, रा. रूम न. ३, न्यू शिवरत्न सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, मीरा गावठाण) हा ओमसाई हरिधाम सोसायटीच्या गेट समोरील रस्त्यावर स्वतःजवळ ९ ग्रॅम वजनाचा मेफेड्रोन (एमडी) हा अमली पदार्थ विक्री करण्यासाठी घेऊन आला असता, तेव्हा पोलिसांना दिसला. पोलिसांनी त्याला अटक करून त्याच्याविरुद्ध गुंगीकारक औषधी द्रव्य व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ अधिनियमाच्या विविध कलमांतर्गत काशिमीरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक शिवाजी खाडे करत आहेत.

CamScanner
Scanned with OKEN Scanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 4

# राजकीय पदाधिकाऱ्यासह तिघांवर खंडणीचा गुन्हा

## मालकाकडून उकळले ३.५ लाख

। वसई : एका ट्रान्सपोर्ट कंपनीच्या मालकाकडून ३.५ लाखांची खंडणी घेतल्याप्रकरणी राजकीय पदाधिकाऱ्यासह तिघांविरोधात वालीव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वसई पूर्व नवघर येथील टेम्पोचालक तथा आर्यन टेम्पो सर्व्हिस ट्रान्सपोर्ट कंपनीचे मालक बिहारी गुप्ता यांनी वालीव पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीनुसार, २८ ऑक्टोबरला सकाळी ९.३०च्या सुमारास राजकीय पदाधिकारी आणि त्याचे तीन साथीदार बिहारी यांच्या कार्यालयात आले. त्यांनी टेम्पोत असलेल्या सामानाची मोबाईलमध्ये शूटिंग करण्यास सुरुवात केली.

यामुळे त्यांच्याकडे या प्रकाराबाबत विचारणा केल्यावर टेम्पोतील माल बेकायदा आहे. तुझी गाडी आणि माल जमा करून तुला पोलिसांच्या हवाली करेन, पालिकेमार्फत तुझा माल जप्त करेन, अशी भीती त्यांनी गुप्ता यांना दाखवली. तसे न करण्यासाठी त्यांनी ५ लाखांची मागणी केली. माझ्याकडे एवढे पैसे नसल्यामुळे ३.५ लाख रुपये दिले, असे गुप्ता यांनी सांगितले. त्यावेळी राजकीय पदाधिकाऱ्याचे दोन साथीदार आले होते. पैसे मिळाल्याची खात्री झाल्यावर राजकीय पदाधिकारी आणि त्याचा एक साथीदार निघून गेले. या प्रकारानंतर राजकीय पदाधिकारी अशा प्रकारे साथीदारांना सोबत घेऊन अनेकांना ब्लॅकमेल करीत असल्याची माहिती गुप्ता यांना मिळाली. अखेर बिहारी गुप्ता यांनी वालीव पोलीस ठाण्यात राजकीय पदाधिकारी आणि त्याच्या तीन साथीदारांविरोधात खंडणी घेतल्याची तक्रार केली. याप्रकरणी राजकीय पदाधिकाऱ्यासह त्याच्या तीन साथीदारांविरोधात वालीव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

पुढारी पु. पान क्र. 4

# मिरारोडमध्ये आचारसंहिता उल्लंघनाचा तिसरा गुन्हा दाखल

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात आदर्श आचारसंहिता लागु झाली असून त्याचे पालन करणे अनिवार्य असताना १४५ मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघात आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याचे निदर्शनात आले असून त्या विरोधात ६ जणांविरुद्ध नयानगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघात आचारसंहिता उल्लंघनाबाबतचा हा तिसरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा रोड येथील नवगृह सोसायटी, पुनम सागर कॉम्पलेक्स येथे २३ व २४ ऑक्टोबर रोजी भाजप पक्षाचे कार्यकर्ते नरेंद्र मेहता व नगरसेवक अनिल विराणी यांच्याकडून मोफत साहित्य वाटप करून आचारसंहितेचा भंग करत असल्याने गुन्हा दाखल करण्याबाबत पत्र व ईमेलव्दारे तक्रार करण्यात आली होती. सोबत फोटो व व्हिडिओ पाठवण्यात आले होते. आलेल्या तक्रारीबाबत एफएसटी भरारी पथकाकडून नयानगर पोलीस ठाण्यात उपलब्ध फोटो, व्हिडिओ व ईमेलबाबत खात्री करण्यासाठी पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार नयानगर पोलीस ठाण्यातून अहवाल प्राप्त झाला. त्या अहवालानुसार व्हिडिओ व फोटो हे नवग्रह सोसायटी , पूनम सागर कॉम्प्लेक्स , मिरा रोड येथील असून २२ ऑक्टोबर रोजी संगीता रवी सिंग भारतीय जनता पार्टी विभाग २१ ची जनरल सेक्रेटरी यांनी कोणतीही पूर्वपरवानगी न घेता हळदी कुंकवाचा कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रेखा विरानी, जिग्ना शहा, सीमा शहा, वंजा देवाडीगा , माजी नगरसेविक अनिल विराणी , मनोज दुबे हजर होते. या हळदी कुंकू कार्यक्रमात महिलांचे खेळ, हळदी कुंकू तसेच फूड पॅकेट व भेट वस्तूचे वाटप हे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले होते.

CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

पुढारी पान क्र. ३

# गीता जैन अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार

## मेहतांच्या उमेदवारीवर जैनसमर्थक माजी नगरसेवकांचा पक्षाचा राजीनामा देण्याचा इशारा

**भाईंदर : पुढारी वृत्तसेवा**

भाजपने मिरा-भाईंदर विधानसभा मतदार संघातून माजी आ. नरेंद्र मेहता यांना उमेदवारी देताच संपतापलेल्या अपक्ष आ. गिता जैन यांनी यंदाची निवडणूक पुन्हा अपक्ष म्हणूनच लढविणार असल्याचे आयोजित पत्रकार परिषदेत जाहीर केले. तर जैन समर्थक माजी नगरसेवकांनी मेहतांना दिलेल्या उमेदवारीवर तीव्र नाराजी व्यक्त करीत पक्षाचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतल्याचे सांगण्यात आले.

गतवेळच्या निवडणुकीत देखील पक्षाने जैन यांच्या तिकीट मिळविण्याच्या मनसुब्याला सुरुंग लावित मेहता यांनाच उमेदवारी दिली होती. त्यावेळी जैन यांनी मेहता विरोधकांची मोट बांधून सुमारे १५ हजार मतांनी मेहता यांचा पराभव केला होता. यावेळी त्यांना मेहता विरोधी सेनेतील नगरसेवकांनी देखील मदत केली



आ. गीता जैन



माजी आ. नरेंद्र मेहता

● मीरा भाईंदर मतदार संघातील भाजपमधील अंतर्गत वाद हा २०१९ च्या निवडणुकीत हि रंगला आणि यावर्षीही तोच प्रकार घडत आहे. भाजपने आमदार गीता जैन यांना उमेदवारी नाकारून पुन्हा नरेंद्र मेहता यांना उमेदवारी दिली असून काँग्रेसने मुझफ्फर हुसेन यांना निवडणूक रिंगणात उतरविले आहे. त्यामुळे तिरंगी अशी चुरशीची लढत होऊन निकाल सांगणे कठीण झाल्याचे चित्र आहे.

होती. यामुळे यांचा पराभव झाल्याचे दिसून आले होते. या दोघांच्या वादात काँग्रेसचे उमेदवार मुझफ्फर हुसैन यांना सुमारे ५६ हजार मते मिळाली होती. यंदाही भाजपने जैन यांच्या तिकीट मिळविण्याच्या मनसुब्याला सुरुंग लावत मेहतांनाच उमेदवारी दिल्याने जैन यांनी पक्षाचा निर्णय चुकीचा असल्याचे म्हटले आहे. तसेच मेहता गंभीर गुन्हे दाखल असून भ्रष्ट असलेल्या मेहतांना उमेदवारी देण्यापूर्वी पक्षाने विचार करणे महत्वाचे होते, असे सल्लाही दिला. मेहता यांना गतवेळप्रमाणेच यंदाच्या निवडणुकीतही पराभूत करण्यासाठी आपण अपक्ष म्हणून निवडणूक लढविणार असल्याचे जैन यांनी जाहीर केले. तर जैन समर्थक माजी नगरसेवक अश्विन कासोदरिया, डॉ. नयना वसानी, प्रतिभा पाटील यांनी समाज माध्यमाद्वारे जिल्हाध्यक्ष किशोर शर्मा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत बावनकुळे यांच्याकडे पक्षाचा राजीनामा पाठविला आहे. याखेरीज येत्या काही दिवसांत जैन समर्थक आणखी माजी नगरसेवक, पदाधिकारी व कार्यकर्ते पक्षाचा राजीनामा देतील, असा दावा करण्यात आला आहे. जैन व मेहता यांच्यासह उमेदवारीवर दावेदारी करणारे माजी जिल्हाध्यक्ष ॲड. रवि व्यास यांच्या समर्थकांमध्ये देखील मेहता यांच्या उमेदवारीवरून उलटसुलट चर्चा सुरु झाली होती. त्यावर व्यास यांनी समाजमाध्यमाद्वारे आपल्या समर्थकांना शांत राहण्याचे आवाहन करीत पक्षासाठी काम करण्याचा सल्ला दिला आहे. यामुळे व्यास यांचा विरोध तूर्तास मावळल्याचे दिसून आले असले तरी जैन समर्थकांमध्ये मात्र अस्वस्थता पसरली आहे. जैन समर्थकांनी पक्षाचा राजीनामा दिल्यास जैन यांना यंदाची निवडणूक जड जाणार असल्याचे बोलले जात आहे.

शहरात भाजपला मानणाऱ्या मतदारांची संख्या मोठ्याप्रमाणात असल्याने त्यांची मते जैन यांच्या विरोधात जाण्याची शक्यता वर्तविली जात आहे. आणि त्याचा फायदा मेहता यांना होणार असल्याची शक्यता वर्तविली जात आहे. या जरतरच्या राजकारणात मेहता यांनी मात्र पक्षाने उमेदवारी दिल्याचे आभार व्यक्त करीत सर्वांना एकत्र घेऊन यंदाच्या निवडणुकीत विजय मिळविण्याचा मानस व्यक्त केला आहे. तर मेहता यांना शह देण्यासाठी जैन यांनी अपक्ष म्हणून निवडणूक रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतल्याने यंदाची निवडणूक मेहता विरुद्ध जैन यांच्यात रंगणार असल्याचे बोलले जात आहे.

CS CamScanner
Scanned with OKEN Scanner

नवभारत पान क्र. 1

# महाराष्ट्र के लॉ एंड ऑर्डर पर चुनाव आयोग सख्त

## पुलिस को कड़ाई बरतने का निर्देश

■ दिल्ली, एजेंसियां. मुख्य निर्वाचन आयुक्त (सीईसी) राजीव कुमार ने मंगलवार को महाराष्ट्र में राजनीति से प्रेरित अपराधों पर चिंता जताई. उन्होंने राज्य के पुलिस प्रमुख को चुनावी माहौल को प्रभावित करने वाले अपराधों पर सख्ती से लगाम लगाने को कहा है. सूत्रों ने यह जानकारी दी. निर्वाचन आयोग ने विधानसभा चुनाव के मद्देनजर कानून-व्यवस्था की समीक्षा के लिए महाराष्ट्र, झारखंड और उनके पड़ोसी राज्यों के मुख्य सचिवों, पुलिस प्रमुखों और अन्य शीर्ष अधिकारियों के साथ समीक्षा बैठक की. सूत्रों के मुताबिक समीक्षा बैठक के दौरान सीईसी कुमार ने महाराष्ट्र में राजनीति से प्रेरित अपराधों पर चिंता जताई और पुलिस महानिदेशक से कहा कि वह सुनिश्चित करें कि इन अपराधों पर कड़ाई से लगाम लगाई जाए. राज्य में हाल ही में राकांपा के नेता बाबा सिद्दीकी की हत्या से राजनीतिक बवाल मचा हुआ है.



### नकदी व शराब पर भी लगाएं अंकुश

निर्वाचन आयोग ने चुनाव से पहले चुनावी राज्यों में नकदी, शराब, नशीले पदार्थ, कीमती धातुओं और अन्य मुफ्त उपहारों सहित प्रलोभनों के प्रवाह पर अंकुश लगाने के प्रयास तेज करने के लिए भी सख्त निर्देश जारी किए हैं. विधानसभा चुनाव की तारीख घोषित किए जाने के बाद से अब तक 345 करोड़ रुपये की जब्ती की गई है, जिसमें महाराष्ट्र से 175 करोड़ रुपये की जब्ती शामिल है तथा शेष राशि उपचुनाव वाले राज्यों से जब्त की गई है.

N.B.T. पान क्र. 2.

# गीता जैन फिर निर्दलीय, BJP से मेहता प्रत्याशी

## मीरा-भाईंदर को लेकर खत्म हुआ सस्पेंस

■ **निसं, मीरा-भाईंदर:** मंगलवार को नामांकन के आखिरी दिन बीजेपी ने मीरा-भाईंदर विधानसभा सीट से नरेंद्र मेहता को टिकट दे दिया। इतने दिन से चला आ रहा सस्पेंस आखिरकार खत्म हो गया है। वहीं, बीजेपी और शिवसेना (शिंदे गुट) दोनों से उम्मीद लगाए बैठी गीता जैन को एक बार फिर निराशा हाथ लगी है। हालांकि, जैन ने निर्दलीय चुनाव लड़ने का ऐलान कर दिया है। जहां जैन से बीजेपी के इस निर्णय पर खेद जताया है, तो वहीं मेहता ने कहा कि उन्हें पार्टी से निष्ठा का फल मिला है। सोमवार को मेहता और जैन दोनों ने बिना पार्टी के बी फॉर्म के ही नामांकन भर दिया था।


### फडणवीस ने वादा खिलाफी की: जैन

बीजेपी का टिकट न मिलने से निराश गीता जैन ने उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पर वादाखिलाफी का आरोप लगाया है। उन्होंने कहा कि फडणवीस ने उनके साथ धोखा किया है। उन्होंने अप्रत्यक्ष रूप से टिकट वितरण में आर्थिक लेन-देन का भी आरोप लगाया। जैन ने कहा कि टिकट की घोषणा के बाद उनकी फडणवीस से फोन पर बात हुई, तो उन्होंने कहा कि वह मजबूर हैं।



### पार्टी से निष्ठा का फल मिला: मेहता

मेहता ने कहा कि उन्हें पार्टी ने निष्ठा का फल दिया है। उन्होंने कहा कि वह जरूरत के हिसाब से पार्टी को नहीं बदलते हैं। संगठन और कार्यकर्ताओं की मांग व उनकी मेहनत का सम्मान करने के लिए उन्होंने शीर्ष नेताओं का आभार प्रकट किया। जैन के फडणवीस पर लगाए गए आरोप पर उन्होंने कहा कि फडणवीस मजबूरी का नहीं, बल्कि मजबूती का नाम हैं।



CS CamScanner

Scanned with OKEN Scanner

N. B.T. पान क्र. 5

## बिजली काटने गए अधिकारी के साथ हुई मारपीट

■ निसं, वसई : वसई पुलिस स्टेशन क्षेत्र के बोरीवाडी मे बिजली का बिल न भरने पर बिजली कनेक्शन काटने गए अधिकारी के साथ मारपीट की गई। अधिकारी की शिकायत पर पुलिस ने दो लोगों के खिलाफ मामला दर्ज किया है। जानकारी के अनुसार, वसई पश्चिम स्थित बोरीवाडी निवासी जुमाना अब्बास टीनवाला ने दो महीने से बिजली का बिल नहीं भरा। सोमवार सुबह बिजली विभाग के अधिकारी विलास देवाजी चौधरी ने उन्हें कॉल किया कि अपना बिल जमा कर दीजिए, नहीं तो बिजली कनेक्शन काट दिया जाएगा। जुमाना ने फिलहाल बिल जमा करने मे असमर्थता जताई। इसके बाद दोपहर 12 बजे चौधरी अपने कर्मचारियों के साथ उनके घर गए और बिजली कनेक्शन काट दिया। आरोप है कि इससे नाराज जुमाना टीनवाला व झाबिया टीनवाला ने अधिकारी के साथ मारपीट कर दी। चौधरी ने इसकी शिकायत पुलिस स्टेशन मे दर्ज कराई है।

**वसई के बोरीवाडी इलाके का है मामला**

## घर देने के नाम पर ठगी का आरोपी बिल्डर दो साल बाद गिरफ्तार



■ निसं, वसईः वालीव पुलिस ने एक ऐसे चॉल बिल्डर को गिरफ्तार किया है, जिसने सस्ते में घर देने के नाम पर लगभग 80 लोगों से तीस लाख रुपये की ठगी की थी। आरोप है कि इस मामले में उसका भाई अब भी फरार है। पुलिस ने बताया कि गिरफ्तार आरोपी व उसके भाई ने वसई पूर्व स्थित राजीवली में 2011 में जमीन ली थी और वहां चॉल बनाने का काम शुरू किया था। दोनों आरोपियों ने यहां सस्ते में घर देने के नाम पर लोगों से ठगी की थी। फिलहाल आरोपी को 1 नवंबर तक पुलिस हिरासत में रखा गया है।

**80 लोगों को चॉल में घर देने के नाम पर की 30 लाख की ठगी**

मीरा रोड निवासी राजेश जैसवाल (50) व उसके भाई ने राजीवली स्थित राजनपाडा मे जमीन ली थी और यहां अवैध तरीके से घर बनाने का काम शुरू किया था। उन्होंने लोगों को यहां सस्ते में घर देने की बात कही और लगभग 80 लोगों से तीस लाख रुपये लिए। कुछ सालों में उसने 30 से 35 घर बना लिए। इस बीच वसई-विरार मनपा ने यहां तोड़क कार्रवाई कर दी। इसमें कई लोग बेघर हो गए। कार्रवाई के बाद उसने घर बनाने का काम बंद कर दिया। इधर लोग उससे अपने पैसे वापस मांगने लगे।

पैसे वापस न मिलने पर 2 अगस्त, 2022 को पीड़ितों ने दोनों के खिलाफ वालीव पुलिस स्टेशन में धोखाधड़ी का मामला दर्ज कराया। राजेश और उसका भाई तभी से फरार थे। दो दिन पहले वालीव पुलिस स्टेशन के डिटेक्शन टीम के सहायक पुलिस निरीक्षक सचिन सानप व उनकी टीम को सूचना मिली कि वह मीरा रोड आया हुआ है। पुलिस की टीम वहां पहुंची और उसे गिरफ्तार कर लिया। सोमवार को उसे वसई कोर्ट में पेश किया गया, जहां से उसे 1 नवंबर तक पुलिस हिरासत में भेज दिया गया है।

## फांसी लगाकर व्यक्ति ने की आत्महत्या



■ निसं, नालासोपाराः तुलिंज पुलिस स्टेशन क्षेत्र के मोरेगांव इलाके में सोमवार दोपहर 42 वर्षीय व्यक्ति ने फांसी लगाकर खुदकुशी कर ली। जानकारी के अनुसार, मोरेगांव स्थित अष्ट विनायक कॉम्प्लेक्स में रहने वाले प्रमोद राम विलास चौबे ने बेडरूम में लगे पंखे पर दुपट्टा बांधकर फांसी लगा ली। खुदकुशी की वजहों का अभी पता नहीं चल सका है।

## फोटो शूट के दौरान खदान में डूबा किशोर

■ निसं, वसईः वालीव पुलिस स्टेशन क्षेत्र के राजीवली खदान में सोमवार को फोटो शूट करने गए तीन युवकों में से एक 17 वर्षीय किशोर की खदान में डूबने से मौत हो गई। जानकारी के अनुसार, किशोर सोमवार सुबह अपने दोस्तों के साथ फोटो शूट के लिए गया था। इस दौरान वह पत्थरों के पास जाकर फोटो शूट करने लगा। तभी अचानक उसका संतुलन बिगड़ गया और वह खदान में डूब गया। सूचना के बाद मौके पर पहुंची फायर ब्रिगेड टीम ने कड़ी मेहनत के बाद शव को बाहर निकाला और पोस्टमॉर्टम के लिए भेज दिया।

## सड़क हादसे में युवक की मौत

■ निसं, नालासोपाराः तुलिंज पुलिस स्टेशन क्षेत्र के संतोष भुवन इलाके में सोमवार दोपहर को एक ट्रक की चपेट में आने से बाइक सवार की मौत हो गई। हादसे के बाद ट्रक चालक फरार हो गया। पुलिस हिट ऐंड रन का मामला दर्ज कर आरोपी की तलाश कर रही है। जानकारी के अनुसार, नालासोपारा पूर्व स्थित बाबा नगर में रहने वाले राकेश शंकर दास (24) व उनका भाई विश्वजीत दास सोमवार दोपहर 3 बजे संतोष भुवन स्थित पेट्रोल पंप पर पेट्रोल भराकर घर जा रहे थे। इस दौरान उनके बगल में चल रहे ट्रक ने उनकी बाइक को ओवरटेक के दौरान टक्कर मार दी। इस हादसे में दोनों भाई सड़क पर गिर गए। ट्रक का पिछला पहिया राकेश के ऊपर से गुजर गया, जिससे उसकी मौत हो गई। वहीं, विश्वजीत को हल्की चोटें आई है। हादसे के बाद ट्रक चालक फरार हो गया।

CamScanner

Scanned with OKEN Scanner

Time India Express

# Narendra Mehta is BJP pick for Mira Bhayandar

EXPRESS NEWS SERVICE
MUMBAI, OCTOBER 29

AMID A fierce power struggle for the Mira Bhayandar constituency in Maharashtra Assembly elections, the BJP on Tuesday awarded the ticket to Narendra Mehta, disregarding other aspirants, including Geeta Jain.

The decision has met with disapproval from Geeta Jain's supporters, who were hoping the party would consider her candidacy, as she was a sitting Independent MLA who had declared her support for the Mahayuti alliance.

In the 2019 Assembly elections, the BJP fielded Narendra Mehta from the seat when Jain rebelled to contest as an Independent and won the elections.

While Jain polled 79,527 (37.60 per cent) votes, her nearest rival, BJP candidate Narendra Mehta, polled 63,992 (30.20 per cent) votes.

Congress candidate Syed Hussain Muzaffar was third with 55,899 votes (26.42 per cent). After the polls, Jain pledged her support to Mahayuti.

In the fourth list released on Tuesday, the BJP announced two candidates, the second one being Sudhir Parwe from Umred constituency in Vidarbha region.

With the last day for filing nominations on Tuesday, the BJP has announced a total of 148 candidates so far. The party has also allocated four seats to its smaller alliance partners: Republican Party of India (A), Rash-triya Samaj Paksha, Yuva Swabhiman Party and Jan Surajya Shakti.

Scanned with OKEN Scanner